# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur.dte@gmail.com Website : rdtenagpur.org.in

कालमर्यादित क्रमांक : तंशिस/प्राकाना/शै.वि/इ.बी.सी/२०१४/3150

इमेलव्दारे/सकंतस्थळावर दिनांक : 04 OCT 2014

प्रति,

प्राचार्य/संचालक,

____________________

(सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्था, एमबीए / एमसीए पदव्युत्तर पदवी, हॉटेल मॅनेजमेंट पदवी / पदवीका संस्था)

विषय:— शैक्षणिक वर्ष २०१४—१५ करीता खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्तीबाबत (संगणक प्रणाली व्दारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे).

संदर्भ:— तंशिसं, म.रा., मंबई यांचे पत्र क्र.१५/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१४/१४४, दि. ३०/०९/२०१४

शैक्षणिक वर्ष २०१४—१५ पासून खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क ५० टक्के प्रतिपुर्ती योजनेची अंमलबजावणी (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर करण्यात येणार असून त्याबाबतची माहिती संस्थांनी भरावयाची आहे.

त्याकरीता आपल्या संस्थेत प्रवेशीत ई.बी.सी. करीता पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज योग्य त्या कागदपत्रासह (जसे कॅप व्दारे प्रवेशित विद्यार्थी असल्याबाबतचा प्रवेश निच्छीत केल्याचे पत्र, आर्थिक वर्ष २०१३—१४ चा सक्षम प्राधिका—याकडून प्राप्त केलेला उत्पनाचा दाखला, अधिवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate), अपत्य प्रमाणपत्र जसे राशन कार्ड इत्यादी) विद्यार्थ्यांकडून प्राप्त करुन घ्यावे. **त्याबाबतचे जाहीर प्रगटन/परिपत्रक आपल्या संस्थेने सुचना फलकावर ठळक पध्दतीने दयावी तसेच सदरची सुचना वर्गामध्ये शिक्षकांमार्फत दयावी.**

उपरोक्त योजनेची माहिती ऑनलाईन संगणक प्रणालीवर भरण्याकरीता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी **दि. ७ ऑक्टोबर २०१४ ते ३१ ऑक्टोबर २०१४** पर्यंत करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. **सदरहू योजनेची शैक्षणिक वर्ष २०१४—१५ करीताची शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती योजनेसंबंधीचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतरच प्रतिपूर्ती मंजूर करण्यात येईल याबाबत आपल्यास्थरावर विद्यार्थ्यांना अवगत करावे.**

सदर योजनेकरीता **कोणताही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता संस्था प्रमुख या नात्याने प्राचार्य** यांनी घ्यावी. विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहिल्यास व त्याबाबत काही प्रकरण उद्‌भवल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख प्राचार्य यांची राहिल याबाबतची गंभिर नोंद घ्यावी.

सदर योजनेकरीता विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीच्या वापराच्या अनुषंगाने आपणास उद्‌भणा—या अडीअडचणी चे निराकरण करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथील **desk3@dte.org.in या ईमेल व दुरध्वनी क्र. ०२२—३०२३३४६८** वर संपर्क साधावा.

सुलभ संदर्भाकरीता सोबत तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भिय पत्र जोडलेले आहे.

सोबत:— वरीलप्रमाणे संदर्भिय पत्र

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर.

D:\EBC\EBC-2014-15 Main Folder\EBC General Letter.doc

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७
तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


क्रमांक:१५/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१४/१४४
दिनांक : 30 सितम्बर SEP 2014

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत (संगणक प्रणाली द्वारे ऑनलाईन अर्ज भरून घेणे )

खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टयास मागास विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी पासून करण्यासाठी (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर माहिती भरावयाची आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाचे www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर EBC Concession येथे माहिती भरावयाची आहे, माहिती भरणेबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत .त्यासाठी सर्व विदयार्थ्यांचे अर्ज व आवश्यक ती कागदपत्रे संस्थेनी उपलब्ध करुन घ्यावयाची आहे. याबाबतचे जाहीर प्रगटन/ परिपत्रक संबंधित संस्थानी सूचना फलकावर ठळक प्रसिध्दी दयावी तसेच सदरची सूचना वर्गामध्ये शिक्षकामार्फत दयावी. संस्थेमधील कोणताही विदयार्थी योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता संबंधित संस्थेच्या प्राचार्यानी घ्यावी .विदयार्थी या योजनेपासून वंचित राहिल्यास याची सर्वश्री जबाबदारी संस्थाप्रमुख प्राचार्य यांची राहिल. अशा सक्त सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

उपरोक्त योजनेची माहिती ऑनलाईन संगणक प्रणालीवर दि. ७ ऑक्टोबर २०१४ पासून **अंतिम दि.३१ ऑक्टोबर २०१४ पर्यंत** भरण्याबाबत सूचना सर्व संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. सन २०१४-१५ मध्ये शैक्षणिक शुल्क प्रतिप्रर्ती योजनेसंबंधी शासन निर्णयानंतरच प्रतिपूर्ती मंजूर करण्यात येईल याबाबत सुध्दा संस्थांना अवगत करावे.

उपरोक्त योजनेसाठी विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीच्या वापराच्या अनुषंगाने वभागीय कार्यालये /अधिनस्त संस्थांन अडीअडचणी उद्‌भवल्यास desk3@dte.org.in या ईमेल व दूरध्वनी क्र.०२२/३०२३३४६८ वर संपर्क साधावा.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक
तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

\\192.168.1.9\Desk15\Kadam EBC 2012-13\ebc letter ro.doc